मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३१६ वा ● मंगळवार, ता. २७ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## रयत समाचारचे स्तंभलेखक ठाणेदार यांचा महाराष्ट्ररत्न पुरस्काराने गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

नालंदा ऑर्गनायझेशन आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ संलग्न पुण्यातील टॅलेंट कट्टा संस्थेतर्फे महाराष्ट्रातील स्तंभलेखक श्याम ठाणेदार यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार देण्यात आला.

ठाणेदार हे दैनिक रयत समाचारमधे समाजसंवाद सदरामधे नियमित स्तंभलेखन करीत असतात. हा महाराष्ट्रातील मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार समजला जातो. ता. २५ मे रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात श्याम ठाणेदार यांना हा पुरस्कार देण्यात आला. २५ मे रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते श्याम ठाणेदार यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पदक असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी व्हायब्रंट सोशल फाऊंडेशनच्या संस्थापिका अश्विनी जाधव, प्रसिद्ध उद्योजक नितीन धवणे पाटील, एआरजे ग्रुप ऑफ इंडस्ट्रीचे चेअरमन जितेंद्र तुळशीराम दाते, कृत्रिम पाऊस संशोधन प्रसिद्ध शास्त्रज्ञ नीता दोषी, टॅलेंट कट्टाचे संस्थापक अध्यक्ष दीपक जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.श्याम ठाणेदार हे महाराष्ट्रातले प्रसिद्ध स्तंभलेखक असून महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रात ते नियमितपणे स्तंभलेखनकरतात.महाराष्ट्रभर त्यांचा वाचकवर्ग आहे. श्याम ठाणेदार यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील प्रबोधनात्मक लेखन कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. स्तंभलेखनातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्ररत्न पुरस्कार मिळाल्याने श्याम ठाणेदार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## शहीद- ए- आझम भगतसिंहचा प्रकाशन सोहळा संपन्न

**इस्लामपूर । प्रतिनिधी**

एक आश्वासक उदयन्मुख संशोधक लेखक प्रतिक पाटोळे यांचे शहीद- ए- आझम भगतसिंह या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा ता.२५ मे रोजी इस्लामपूर येथे संपन्न झाला. या प्रकाशन सोहळ्यासाठी कोल्हापूरच्या इतिहास अभ्यासक डॉ. देविकाराणी पाटील उपस्थित होत्या. हा परिसर म्हणजे १९४२ च्या चलेजाव चळवळीतील प्रतिसरकारचा बालेकिल्लाच होता. प्रतिसरकारमधील क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांनाही यावेळी बोलवून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू अ‍ॅड. सुभाषबापू पाटील सहभागी होते. या सर्वांना भेटून त्यांच्याशी बोलून खूप आनंद झाला. अशा या क्रांतिकारकांच्या भूमीतच शहीद- ए- आझम भगतसिंहच्या विचाराची तरुण तडफदार पिढी निर्माण होत आहे. ही आजच्या काळात आशेचा किरण दाखवणारी गोष्ट आहे. आजच्या तरुणाला भगतसिंग आणि त्यांचे तेजस्वी विचार समजून घेण्यासाठी या तरुण संशोधकाचा हा ग्रंथ खूप साह्य करणार आहे, अशी माहिती डॉ. देविकाराणी पाटील यांनी दिली. ग्रंथासाठी प्रतिक ७५५९१९८४७५ यांना संपर्क करा.

# अनुदानित शाळा बंद करण्याच्या निर्णयाला कपिल पाटलांचा विरोध

## शासन निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

शालेय शिक्षणातील अन्यायकारक धोरणांविरोधात आवाज उठवत अखिल भारतीय शिक्षक परिषद आणि विविध शिक्षक संघटनांचे नेते तसेत शिक्षकभारतीचे प्रमुख आमदार कपिल पाटील यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे आणि शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांना महत्वाचे निवेदन दिले. अनुदानित शाळा बंद करण्याच्या दिशेने सरकार पावले टाकत असल्याचा आरोप करत त्यांनी ता २८ ऑगस्ट २०१५ आणि ता.१५ मार्च २०२४ या दोन शासन निर्णयांना तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे.



''मराठीसह सर्व भाषिक शाळांवर गंडांतर'' कपिल पाटील यांच्या मते, माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या कार्यकाळात घेतलेला अनुदानित शाळा बंद करण्याचा निर्णय मागच्या दाराने पुन्हा लागू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यांनी असा इशारा दिला आहे की, ''जर शासन हे धोरण पुढे रेटणार असेल, तर रस्त्यावर उतरून त्याचा तीव्र विरोध केला जाईल.'' निर्णय योग्य, पण अनुदानित शाळा का नाही वाचवल्या जात? कपिल पाटील यांनी शाळा - (द्विभाषिक) करण्याच्या शासनाच्या निर्णयाचे स्वागत करताना प्रश्न उपस्थित केला की, ''अनुदानित शाळांनाही असेच द्विभाषिक करून वाचवणे सहज शक्य आहे. परंतु सरकार या शाळांमध्ये विषय शिकवण्यासाठी शिक्षकच नियुक्त करत नाही आणि परिणामी शाळा आपोआप बंद पडतात. ही पद्धत अत्यंत घातक आहे.'' ''कष्टकरी समाजाला मुंबईतून हद्दपार करण्याचा डाव?'' मुंबईतील कष्टकरी वर्ग आधीच उपनगरात आणि शहराबाहेर ढकलला गेला असून, आता उरलेल्या वर्गाच्या मुलांचे शिक्षण बंद करून त्यांनाही शिक्षणाच्या अधिकारापासून दूर लोटले जात आहे का? असा गंभीर सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

ते म्हणतात, ''ही योजना कशासाठी आहे? की लाडक्या बहिणींच्या लेकरांना शाळांपासून वंचित ठेवण्याचा योजनाबद्ध प्रयत्न सुरू आहे?'' शासनाच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. कपिल पाटील यांनी स्पष्ट केले आहे की, अनुदानित शाळा या गरीब व कष्टकरी वर्गासाठी शिक्षणाचा एकमेव आधार आहेत आणि त्या चालवण्याची पूर्ण जबाबदारी सरकारचीच आहे. म्हणूनच संबंधित शासन निर्णय तात्काळ मागे घेण्याची विनंती त्यांनी केली आहे.



# शनिजयंतीला दीड लाखाहून अधिक भाविकांचे शनिदर्शन

**नेवासा । विजय खंडागळे**

शनिभक्ताचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील शनी जयंती उत्सव मोठ्या आनंदात पार पडला. याप्रसंगी काशी आणि प्रवारासंगम इथून आणलेल्या पवित्र जलाने जलाभिषेक करण्यात आला. यावेळी कावडधारकांची सुंदर अशा बँड पथकासह भगव्या वस्त्रांसह मिरवणूक काढून शनिदेवाच्या नामघोषात तेल अभिषेक व जलाभिषेकाने देवाला स्नान घातले, मनोभावी शनीदर्शन घेण्यात आले. यावेळी दीड लाखाहून अधिक भाविकांची गर्दी झाल्याचे दिसले. शनैश्वर देवस्थानमधील सिटू कामगार संघटनेच्या सर्व कर्मचारी सभासदांनी नेहमीप्रमाणे शनिभक्तांची चांगली सोय केली. मध्य प्रदेश इंदौर येथील शनिभक्त अतुल माहेश्वरी, यामिनी योगी तसेच किर्ती बोगावत, अभिनव बोगावत, रक्षित बोगावत यांनी दर्शन घेतले. सकाळची आरती गुजरातचे शनीभक्त पंकज कुमार, न्यायाधीश बी.वाय. जाधव यांच्या हस्ते, दुपारची आरती शनीभक्त सौरभ बोरा, ऑस्ट्रेलियाचे शनी भक्त मातासाहेब, दिल्लीचे प्रसाद प्रधान यांचे हस्ते तर सायंकाळीची आरती पद्मश्री पोपट पवार, ऑस्ट्रेलियाचे शनीभक्त राकेश कुमार, झीम बॉम्बेचे शनी भक्त जयेश शहा यांच्या हस्ते करण्यात आली. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट, सुवासिक अगरबत्ती अशात नयनरम्य परिसर उजाळून निघत होता.

यावेळी मान्यवरांचे स्वागत देवस्थानचे अध्यक्ष भागवत बनकर, उपाध्यक्ष विकास बानकर, तांत्रिक अधिकारी उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे, कार्यकारी अधिकारी जी.के. दरंदले, सरचिटणीस आप्पासाहेब शेटे, राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील अ‍ॅड. सयाराम बानकर, माजी विश्वस्त सुरेश बनकर यांनी केले.

# प्रशासक डांगेसह अधिकाऱ्यांवर ॲट्रॉसिटी दाखल करा

## डॉ. अनिल बोरगे यांची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगर पालिकेचे निलंबित वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांनी महत्त्वाचा आणि गंभीर आरोप करत मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, उपायुक्त विजयकुमार मुंढे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, सहाय्यक आयुक्त मेहर लहारे तसेच प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांच्या विरोधात अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी ॲक्ट) आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. डॉ. बोरगे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या निवेदनात आरोप केला आहे की, २०१० पासून प्रामाणिक सेवा बजावत असतानाही वरील अधिकाऱ्यांनी वैयक्तिक द्वेष आणि जातीच्या आधारावर त्यांच्यावर अन्याय केला. त्यांना बेकायदेशीरपणे सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले, आणि त्यांच्याविरोधात खोटे पुरावे तयार करून, मनमानी चौकशी समितीद्वारे कारवाई करण्यात आली. या प्रकरणात कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ४०९, ४२० आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर डॉ. बोरगे यांना अटक होऊन



६ दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. ही कारवाई पूर्णपणे बनावट आणि द्वेषमूलक असल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे. डॉ. बोरगे म्हणाले, ''या खोट्या गुन्ह्यामुळे माझी सामाजिक, मानसिक आणि आर्थिक हानी झाली असून, माझ्या कुटुंबावरही याचे गंभीर परिणाम झाले आहेत. मी २५ वर्षांत जे प्रतिष्ठेने मिळवलं, ते एका झटक्यात धुळीत मिळालं.'' त्यांनी सखोल चौकशीची मागणी करत दोषी अधिकाऱ्यांवर अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व नागरिक सुरक्षा संहितेच्या अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. तक्रारकर्ते: डॉ. अनिल बोरगे, निलंबित वैद्यकीय आरोग्य अधिकारी आरोपी अधिकारी: यशवंत डांगे, विजयकुमार मुंढे, विशाल पवार, मेहर लहारे, डॉ. सतीश राजुरकर तक्रारीचा मुख्य आधार: जातीय द्वेषातून खोट्या गुन्ह्यांची कारवाई कायदे: अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता.

### कारमधे मंत्रालय ?



**पोलीस, महाराष्ट्र शासन, भारत सरकार अशा पाट्या वाहनावर पाहिल्या, आता लोक मंत्रालय सुद्धा लिहायला लागलेत. धन्य अव्यवस्था.**

(छायाचित्र - एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

# देशात दरवर्षी एक कोटी लग्ने लागतात

भारतात लग्ने आणि अनुषंगिक समारंभांवर होणाऱ्या खर्चावर चर्चा होत असतात. काही आकडेवारी. देशात दरवर्षी एक कोटी लग्ने लागतात. आणि त्यावर दरवर्षी १० लाख कोटी रुपये खर्च होत असतात. म्हणजे एका लग्नात सरासरी १० लाख रुपये (गुगल करा ) रिटेल मार्केटमध्ये अन्नधान्य, खाद्य पदार्थ याच्यानंतर हा दुसऱ्या क्रमांकाचा उद्योग आहे, असे सांगितले जाते. लग्न सोहळा हा आता उद्योग म्हणून उभा रहात आहे. साहजिकच त्यात अनेक कॉर्पोरेट इंटरेस्ट तयार होत आहेत. एकदा का एखाद्या ॲक्टिव्हिटीवर कॉर्पोरेट क्षेत्राची नजर गेली, त्यात आपला धंदा / विक्री / नफा वाढवण्यासाठी प्रचंड वाव आहे याचा वास जरी कॉर्पोरेट क्षेत्राला आला तर त्या उद्योगाची काही खैर नाही. आपल्याला वाटते आपले अनेक निर्णय आपण स्वतः घेत असतो. ते तेवढ्याच अर्थाने खरे आहे की कोणी डोक्यावर बंदूक ठेवून ते निर्णय घेण्यास आपल्याला भाग पाडत नाही. हीच तर जाहिरात, मार्केटिंग क्षेत्राची ताकद आहे. बॉलीवूड, टिव्ही, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सोशल मीडिया इतक्या विविध माध्यमातून ते आपल्या आनंदाच्या, उपभोगाच्या, सामाजिक स्थानाच्या / स्टेटसच्या आणि एकूणच मानवी आयुष्याच्या कल्पनांना त्यांना हवा तसा आकार देत असतात. कुटुंबसंस्था, परंपरा, धर्म यांचे धागे त्यात गुंफले गेलेले असतात. जाहिरात, मार्केटिंग वगैरे क्षेत्रात अत्यंत निर्दयी लोक आहेत हे तर झालेच. पण त्यांच्यावरच्या टीकेतून परिस्थिती बदलणार नाही. आपण आपली सारासार विचारक्षमता, आपल्या हिताचे काय अहिताचे काय, अल्पकालीन आनंद घेऊन आपण कर्जबाजारीपणाच्या दीर्घकालीन यातना स्वतःहून घेत आहोत का ? जे पैसे लग्नात खर्च होतात त्यातील काही वैवाहिक आयुष्यासाठी, जन्माला येणाऱ्या मुलांसाठी उपयोगी पडतील का. हे ठरवण्याची शक्ती गमावून बसत आहोत का ? याबद्दल किमान आताच्या शाळा, कॉलेजमधील मुलामुलींनी विचार करावा. साधेपणाने लग्न का, कर्जे काढून प्रचंड खर्चिक लग्न अशी बायनरीमध्ये अडकू नका. मग, त्यामुळे देशाच्या जीडीपीमध्ये भर पडते अशा शाळकरी बुद्धीच्या लोकांच्या नादी लागू नका.



संजीव चांदोरकर

--------

**अर्थवार्ता**

# मुलीसाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा

## शामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन; अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दी कीर्तन महोत्सवाची सांगता

**बीड । प्रतिनिधी**

स्त्रीयांना योग्य संधी व स्वातंत्र्य मिळालं की त्या आपलं कर्तृत्व सिद्ध करतात. म्हणून मुलींच्या लग्नाची घाई न करता त्यांना ज्या क्षेत्रात शिक्षण, करियर करायचे असेल ते करू द्या. त्या नक्कीच यश मिळवतील, असा विश्वास हभप शामसुंदर महाराज सोन्नर यांनी व्यक्त केला. वैष्णवी हागवणे सारख्या घटना टाळायच्या असतील तर मुलगी हे परक्याचं धन आहे ही भावना डोक्यातून काढून टाका. तिच्यासाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा, असे आवाहनही त्यांनी सिरसाळा येथे केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दीनिमित्त सिरसाळा येथे शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ. हरिश्चंद्र वंगे, प्रभाकर वाघमोडे, माऊली गडदे, ॲड. अजय बुरांडे, भीमराव सातपुते, बाबुराव





रुपनर, सुभाष सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बंडू खांडेकर यांनी बहारदार सूत्र संचालन केले. तर सतीश काळे यांनी आभार मानले. यावेळी बोलताना शामसुंदर महाराज सोन्नर पुढे म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी सर्व जातीधर्मातील लोकांसाठी काम केले. एक आदर्श राज्य कसे चालवावे याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. परंतु त्यांच्या जयंतीला डिजे लावून, दारू पिऊन धांगडधिंगा केला जातो, हे दुर्दैव आहे. डीजेमुक्त जयंतीचा संकल्प करा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी डॉ. वंगे म्हणाले, एखाद्या महामानवाची जयंती त्याच समाजाचे लोक साजरी करतात. परंतू इथे सर्व जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन हा सोहळा आयोजित केला, हे महत्वाचे आहे. जयंतीच्या निमित्ताने डीजे आणि व्यसनाच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुणाईला कीर्तन महोत्सवाचा दिलेला पर्याय हा खूप महत्वाचा आहे, असे माऊली गडदे म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. किर्तन महोत्सव यशस्वी करण्यासाठी बंडू खांडेकर, मुन्ना काळे, सतीश काळे, अशोक गलांडे, शिवाजी काळे, बाबासाहेब काळे, व्यंकटेश काळे, नितेश काळे, गोरख काळे, विठ्ठल वानरे, अशोक देवकते, शेंडगे सर, मदन वाघमारे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

### वारकरी रिंगण आणि मोटारसायकल रॅली

**अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाच्या समारोपानिमित्त सिरसाळा येथे मोटार सायकल रॅली आणि दिंडीचे आयोजन केले होते. दिंडी दरम्यान केलेल्या गोल रिंगणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिंगणात तरुण कार्यकर्त्यांनी ताल धरला होता. हा आनंद डीजेपेक्षा किती तरी जास्त असल्याच्या भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.**



# अवकाळी पावसाचा कहर

## शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**अहमदनगर । तुषार सोनवणे**

जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून (२४ व २५ मे) सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक गावांमध्ये शेती, फळबागा आणि जनावरांवर मोठा परिणाम झाला. भारतीय हवामान विभागाने याआधीच मुसळधार पावसाचा इशारा दिला होता आणि तो खरा ठरला.

अधिक माहिती घेण्यासाठी रयत समाचार प्रतिनिधी यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे संपर्क साधला असता लँडलाईन दूरध्वनीच्या तांत्रिक अडचणीमुळे संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अहिल्यानगर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांनी जनतेसाठी व्हॉट्सअप क्रमांक असलेला मोबाईल नंबर सार्वजनिक जनतेसाठी जाहीर करावा.

तथापि संगमनेर, अकोले, पारनेर, कर्जत, राहुरी, पाथर्डी, श्रीगोंदा, शेवगाव आणि जामखेड तालुक्यांमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह गारपिटीसह पावसाचा अनुभव आला. या पावसामुळे आंबा, डाळिंब, द्राक्ष, टोमॅटो, कांदा, पेरू, लिंबू या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ५९ हून अधिक गावांमध्ये शेतीचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. काही भागांत जनावरांचे आश्रयस्थाने कोसळल्यामुळे नुकसान वाढले आहे. शेतकऱ्यांना आता आर्थिक मदतीची प्रतीक्षा असून जिल्हा प्रशासनाकडून पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. स्थानिक शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने आर्थिक मदत आणि पीकविमा भरपाईची मागणी केली आहे. हवामान विभागानुसार पुढील काही दिवसांतही हलका ते मध्यम पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असा सल्ला प्रशासनाकडून देण्यात आला आहे.




# समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा- दीक्षा घाटविसावे

## प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा

**अहमदनगर । समीर मन्यार**

येथील प्रयत्न नर्सिंग कॉलेज मध्ये नुकताच जागतिक परिचर्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वैश्विक आरोग्यासाठी परिचारिकांनी प्रार्थना केली व अविरत परिचर्या सेवेसाठी शपथ घेऊन दीप प्रज्वलन केले.

यावेळी रुग्णसेवेमध्ये परिचारिकांचे स्थान अद्वितीय असून निस्वार्थ भावनेने समाजसेवा करण्यात परिचारिकांचा मोलाचा वाटा आहे. असे प्रतिपादन प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या दीक्षा घाटविसावे यांनी केले. याप्रसंगी प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे यशस्वीरित्या नर्सिंग शिक्षण पूर्ण करून ज्या विद्यार्थ्यांना बाहेरील देशांमध्ये, आर्मी हॉस्पिटलमध्ये त्याचबरोबर डी.एम.ई.आर., डी.एच.एस. मध्ये गव्हर्मेंट नोकरी लगेचच उपलब्ध होऊन कामाची सुवर्णसंधी मिळाली आहे व ज्या विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्यू द्वारे एन. ए. बी. एच. ऍक्रेडेबल मल्टीस्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्य सिलेक्शन झालेल्या, अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील आयुष्याच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रयत्न नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी, परिचारिका समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कशाप्रकारे कार्य करून आपली महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात याचे नाट्य स्वरूपात सादरीकरण केले, तसेच परिचारिका सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांनी गीत व नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

परिचारिका दिनानिमित्त कॉलेज च्या वतीने पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मॉडेल्स मेकिंग स्पर्धा, लोगो स्पर्धा, प्रश्नमंजुषा असे वेगवेगळे उपक्रम आयोजित केले गेले व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले

कॉलेजच्या मुख्याध्यापिका दिक्षा घाटविसावे व शिक्षिका स्मिता तडके, शिक्षक अविष्कार बिडवे यांना उपदेशक व बुथ हॉस्पिटल अहमदनगर, यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय भव्य परिचारिका गौरव पुरस्कार सोहळ्यामध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आल्याबद्दल प्रयत्न नर्सिंग कॉलेजचे अध्यक्ष डॉ. विक्रम म्हस्के व संचालिका डॉ. शितल म्हस्के व इतर सर्व विश्वस्तांनी कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

# प्रवेश फी व दाखला फी च्या नावाखाली होणारी लूट थांबवा– तुकाराम गेरंगे

## मानव विकास परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**नगर तालुका । प्रतिनिधी**

येथील इसळक निंबळक माध्यमिक विद्यालयात प्रवेश फी व दाखला फी च्या नावाखाली होणारे लूट थांबवण्याच्या मागणीसाठी मानव विकास परिषदेच्या वतीने जिल्हा परिषदचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देताना मानव विकास परिषद महाराष्ट्र राज्य युवक संघटक तुकाराम गेरंगे आदी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, माध्यमिक विद्यालय इसळक निंबळक या विद्यालयात विद्यार्थी यांच्याकडून होत असलेल्या प्रवेश फी व दाखले फी अवाजवी पद्धतीने वसूल करत आहेत व या विद्यालयात गेले दोन वर्षापासून विद्यार्थी यांच्याकडून प्रवेश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रवेश फी आकारली जात आहे. इयत्ता ५ वी ते ८ वीपर्यंत च्या विद्यार्थ्यांकडून ३ हजार रुपये प्रवेश फी ठेवण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता ८ वी ते १० वी वर्गात प्रवेश घेणाऱ्यांसाठी ५ हजार घेतली जाते.



माध्यमिक विद्यालय मध्ये प्रवेश फी घेतल्याने या अगोदरही आपल्या कार्यालयाकडे ग्रामस्थ व ग्रामपंचायत सरपंच प्रियंका लामखडे यांनी वेळोवेळी तक्रारी केलेले आहेत. व ग्रामसभेचा ठराव ही घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने माध्यमिक विद्यालयातील अधिकारी यांनी ता. १९ जून २०२४ रोजी चौकशी समिती नेमून याबाबत चौकशी केली असता. विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. एम. मगर यांनी विद्यार्थ्यांकडून प्रवेश फी घेतल्या बाबत चौकशी अहवालामध्ये सिद्ध करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेली प्रवेश फी विद्यार्थ्यांना पुन्हा देण्यात येईल असे सांगितलेले असतात आज रोजी पर्यंत कुठल्याही विद्यार्थ्यांना प्रवेश फी चे पैसे पुन्हा दिलेले नाहीत. याउलट पुन्हा चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश फि घेण्यास सुरुवात केलेली आहे. तसेच आत्ताच दहावीचा निकाल लागलेला आहे विद्यार्थ्यांकडून दाखला फी च्या नावाने २०० रुपये ३०० रुपये प्रमाणे फी आकारली जाते माध्यमिक शिक्षणाधिकारी साहेब सोलापूर यांनी या प्रकारे फी स्विकारता येत नाही व माध्यमिक शाळा संहिता मध्ये असा कुठलाही नियम नसल्याने विद्यार्थी यांना दाखला देताना कोणतीही फी स्वीकारू नये असा आदेश दिलेला आहे. त्याप्रमाणे आपणही या अर्जाची दखल घेऊन विद्यालयाचे मुख्याध्यापक पर्यवेक्षक व लिपिक यांना तात्काळ आदेश करावे व विद्यार्थ्यांची होणारी जुलमी लूट तात्काळ थांबवावी व सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आलेले आहे. की कोणीही विद्यालयाकडून पैशाची मागणी केली असता दाखला फी व प्रवेश फी देऊ नये ही विनंती. प्रवेश फीची व दाखला फी मागणी होत असल्यास सरपंच ग्रामपंचायत निंबळक यांच्याशी विद्यार्थी व पालकांनी संपर्क करावा.

# शहर स्थापना दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

**अहमदनगर । आबीद खान**

अलकरम एज्युकेशन अँड सोशल सोसायटी, अलकरम हॉस्पिटलच्या वतीने अहमदनगर शहर ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त विविध रक्त व लघवी तपासण्या, सोनोग्राफी, एक्स-रे, प्रसुती तसेच मोफत थायरॉईड आणि यूरिक ॲसिड तपासणी आदी मध्ये रुग्णांना सवलतीत उपचार शिबीराचे मंगळवार ता. २७ मे २०२५ रोजी सकाळी १० ते १ वाजे पर्यंत आयोजित केले आहे. अशी माहिती डॉ. अशपाक पटेल यांनी दिली. यामध्ये रक्त व लघवी तपासणी मध्ये ३० ते ५० टक्के सूट, एक्स-रे २०० रुपयात, सोनोग्राफी सर्व तपासण्यावर वीस ते तीस टक्के सूट, प्रसूती नॉर्मल ११००० सिजेरियन प्रसूती २१ हजार रुपये, फोटोथेरपी मध्ये ३० ते ४० टक्के सूट देण्यात येईल असे डॉ. जहीर मुजावर यांनी सांगितले. तरी या शिबिराचं जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी फायदा घ्यावा व अधिक माहितीसाठी तौफिक तांबोली यांच्याशी ९८६०७०८०१६ – ० २४१-२४२ ३३३३ या नंबर वर संपर्क करण्याचे आवाहन शेरअली शेख यांनी केले आहे.


अहमद निजामशाहा ची कबर

AL KARAM Social & Educational Society

# येताय ना बाप्पा एकांकिकेला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील कांकरिया मानकन्हैय्या ट्रस्टच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या नाट्यस्पर्धेत 'येताय ना बाप्पा' या एकांकिकेने रसिक प्रेक्षकांची मनं जिंकली. सावेडीतील रावसाहेब पटवर्धन सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग घेतला होता.




स्पर्धेत 'आमचे आम्हीच' या अहिल्यानगरच्या नाट्यसंस्थेने सादर केलेली 'येताय ना बाप्पा' ही एकांकिका विशेष चर्चेचा विषय ठरली.उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन ही काळाची गरज असल्याचा प्रभावी संदेश या नाटिकेद्वारे देण्यात आला. या सादरीकरणाला प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळाली. उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल या एकांकिकेला उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक मिळाले.

या नाटकात पोपट धामणे, बाळासाहेब देशमुख आणि उदय वैद्य यांनी प्रभावी भूमिका साकारल्या. नाट्यसंहितेचे लेखन चंद्रशेखर जोशी यांनी केले असून वेशभूषा व संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी विशाख वैद्य यांनी समर्थपणे सांभाळली. बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी व्यासपीठावर डॉ. सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर, कवी चंद्रकांत पालवे आदी मान्यवर उपस्थित होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर – ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल – rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# वळण योजनांसाठी खासदार वाकचौरे यांनी जलशक्ती मंत्र्यांची घेतली भेट

## शेतकऱ्यांमध्ये आशेचा किरण

**कोपरगाव । किसन पवार**

सन १९५२ पासून प्रलंबित असलेल्या उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील सह्याद्री घाटमाथ्यावरून अरबी समुद्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा शेती सिंचनासाठी वापर व्हावा यासाठी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची नुकतीच दिल्लीत भेट घेतली. यावेळी सुमारे ३० वळण योजनांद्वारे ९० टीएमसी पाण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची मागणी करण्यात आली. यावर मंत्री पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक सहकार्याचे आश्वासन दिले आहे.

या निर्णयामुळे उत्तर नगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त १८२ गावांतील शेतकऱ्यांमध्ये समाधानाची भावना आहे. निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यांसाठी निळवंडे कालवा कृती समितीने, वकील अजित काळे यांच्या मोफत विधी सहाय्याने आणि खासदार वाकचौरे यांच्या पुढाकाराने पाठपुरावा केला आहे. सद्यस्थितीत वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर असले तरी, केवळ ८.३२ टीएमसी पाणी साठवणूक क्षमतेमुळे ६८,८७८ हेक्टर सिंचनासाठी पाणी अपुरे पडणार असल्याची शक्यता आहे.



याशिवाय, नाशिक पूर्व, शिर्डी, समृद्धी महामार्ग, तसेच सुरत–चेन्नई राष्ट्रीय महामार्गालगतच्या वाढत्या उद्योगांसाठीही भविष्यात पाण्याची मोठी गरज भासणार आहे. त्यामुळे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे ही काळाची गरज बनली आहे. गेली ७५ वर्षे या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले असले तरी, आगामी काळात यावर ठोस उपाययोजना होणे आवश्यक असल्याचा सूर आता उमटू लागला आहे. या पार्श्वभूमीवर खासदार वाकचौरे यांनी लोकसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार जलशक्ती मंत्र्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. या भेटीदरम्यान संसद भवनात यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली असून, केंद्र सरकारकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा आहे. सदर प्रसंगी शेतकरी संघटनेचे नानासाहेब जवरे, निळवंडे कालवा कृती समितीचे गंगाधर रहाणे, कैलास गव्हाणे, नानासाहेब गाढवे, उत्तमराव जोंधळे, विलास गुळवे, तानाजी शिंदे, सौरभ शेळके, महेंद्र सोनवणे, बाळासाहेब थोरात, दत्तात्रय थोरात, विजय थोरात, विजय शिंदे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी राष्ट्रपतींना साकडे

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीतर्फे तहसीलदार श्रीरामपूर मिलिंदकुमार वाघ यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हंटले आहे की, बोधगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे तसेच महाबोधी विहार टेम्पल अ‍ॅक्ट १९४ हा कायदा रद्द करण्यात यावा या मागणीसाठी गेल्या १२ फेब्रुवारीपासून भारतीय भिक्कू संघ बेमुदत धरणे आंदोलन करत आहे. सध्या महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाने जोर पकडला असून महाबोधी विहार परिसरात उपोषणे तसेच देशातील विविध भागात आंदोलने सुरू आहेत. जागतिक बौद्ध समुदायाकडून भारत सरकारला अपिले केली जात आहेत. १९४९ च्या कायद्यानुसार महाबोधी महाविहार व्यवस्थापनामध्ये नऊ पैकी फक्त चार बौद्ध व्यवस्थापक मंडळावर आहेत. जसे मशीद मध्ये मौलवी, चर्चमध्ये पादरी, गुरुद्वारा मध्ये शिख धर्मगुरू, मंदिरामध्ये हिंदू व्यवस्थापक असतात. त्याचप्रमाणे महाबोधी विहारांमध्ये ही बौद्धच व्यवस्थापनात असले पाहिजे. या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या बौद्ध भिक्षूंना व कार्यकर्त्यांना बिहार पोलीस प्रशासनाने बेकायदेशीर अटक करून त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले आहे. हे गुन्हे तात्काळ रद्द करून सर्व भंतेजी व कार्यकर्ते यांना सरकारने मुक्त करावे व १९४९ चा महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा रद्द करावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष सुगंध इंगळे, जिल्हा महासचिव अशोक बोरुडे, ऑल इंडिया बुद्धिस्ट नेटवर्कचे राजेश हिवाळे, भारतीय कर्मचारी संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रमेश मकासरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश बोर्डे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे डॉ. सलीम शेख, युनायटेड मुस्लिम फोरमचे जिल्हाध्यक्ष मुश्ताकभाई तांबोळी, विद्रोही विद्यार्थी संघटनेचे अ‍ॅड. अमोल सोनवणे, भारतीय स्वाभिमानी संघाचे सुधाकर बागुल, भारतीय कर्मचारी संघाचे संदीप पाळंदे, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे भीमराव कदम, कवी आनंदा साळवे, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष संजय साळवे, ऑल इंडिया बुद्धिस्ट नेटवर्कचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. अण्णासाहेब मोहन, दलित पॅंथरचे संजय वाहुळ, अण्णासाहेब झीने, जेतवन बौद्ध विहार समितीचे अमोल शेळके, पंकज शेळके, बापू शेळके, रवी बोर्डे, भारत शिंगे, विजय जगताप, एन.डी. साळवे, जे. डी. पठारे, राजीव शेळके, ए. आर. शेळके, भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक भाऊसाहेब हिवराळे, के. सी. जमदाडे, नि. मा. पठारे, अंतोन भरपूर, गजानन पठारे विविध सामाजिक संघटनासह बौद्ध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई द्या

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे फळबागांचे तसेच कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

शासनाने शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसेना उबाठा पक्षाचे वतीने करण्यात आली. तहसिलदार यांना २६ मे रोजी मागणीचे निवेदन देण्यात आले. आमच्या मागणीची तातडीने



दखल घेण्यात यावी असे म्हटले आहे. या वेळी शिवसेना शहर प्रमुख संतोष खेतमाळीस, श्रीगोंदा तालुका समन्वयक अमोल बोरुडे, मांडवगण गण प्रमुख रवींद्र उल्हारे, तालुका उप प्रमुख संदीप उगले, युवासेना शहर संघटक किरण बनसूडे हे उपस्थित होते.

# कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अतुल लोखंडे अपात्र

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा काष्टी चे सरपंच साजन पाचपुते यांनी पणन संचालककडे दिलेल्या तक्रारीवरून पणन संचालकांनी जिल्हा उपनिबंधक गणेश पूरी यांना चौकशी अहवाल मागविण्याचे आदेश दिले होते. तक्रारीतील मुद्द्याच्या अनुसरून सहाय्यक निबंधक अभिमान थोरात यांनी चौकशी अहवाल सादर केला. त्या अहवालात प्राथमिक गरजांऐवजी दुय्यम प्रधान्यांच्या गरजांवर खर्च करणे, प्रमाणापेक्षा जास्त रोजंदारी कर्मचारी घेणे, गाडी धारकांची नव्याने करार नवीन न करणे ,हातावर रोख शिल्लक ठेवणे आदी आक्षेप नोंदविले होते. प्राप्त अहवालारुन अपात्र ठरवुन जिल्हा उपनिबंधक गणेश पूरी यांनी ता. २३ मे २५ रोजी सभापती अतुल लोखंडे यांना अपात्रतेचा आदेश काढला. या निर्णयामुळे मा.आमदार राहुल जगताप यांची श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीतील सत्ताही धोक्यात आली आहे.

# रॉंग साईडने वाहन चालवणाऱ्या ६ जणांवर कारवाई

## एसटी चालकाचाही समावेश



**राहुरी । दत्ता जोगदंड**

शहर व परिसरात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणाऱ्या रॉंग साईड वाहनचालकांवर पोलिसांनी कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. २५ मे २०२५ रोजी, रॉंग साईडने गाडी घालून ट्राफिक जाम करणाऱ्या ६ वाहनचालकांविरोधात मोटार वाहन कायदा कलम १२२/१७७ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, शिर्डी–शनीशिंगणापूर रस्त्यावर पर्यटकांची वाहतूक करणाऱ्या काही वाहनचालकांनाही या कारवाईचा फटका बसला आहे. यासोबतच, अकलूज डेपोची एसटी बस (–१४––४२२४) देखील रॉंग साईडने धोकादायक वाहन चालवताना आढळली. सदर बसचालकावर मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, याबाबत न्यायालयीन दंडाची रक्कम चार हजार रुपये तसेच सहा महिने ते एक वर्षापर्यंत कारावास होऊ शकतो. या पूर्वीही, १० मे २०२५ रोजी दोन वाहनचालकांवर अशाच प्रकारे कारवाई करून न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येकी सुमारे पाच हजार रुपये दंड ठोठावण्यात आले होते. इतकेच नव्हे तर, ११ मे रोजी एसटी महामंडळाच्या चालकांना रॉंग साईड गाडी टाकण्याबाबत खबरदारीचे पत्रही बसस्थानक प्रमुख, राहुरी व आगार प्रमुख, श्रीरामपूर यांना देण्यात आले होते. वाहतूक नियंत्रणासाठी ही मोहीम पीएसआय आहेर, पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, हवालदार फुलमाळी, आणि सचिन ताजणे यांच्या पथकाने राबवली. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुवर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली, राहुरी पोलीस स्टेशनचे निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस निरीक्षक ठेंगे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी कोणताही चालक रॉंग साईडने गाडी टाकून ट्राफिक जाम करू नये. तसेच अशा स्वरूपाच्या कारवाया राहुरी शहर व राहुरी फॅक्टरी परिसरात नियमितपणे सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



# नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी घेतली किसन बाबुराव तथा अण्णा हजारे यांची भेट

**पारनेर । प्रतिनिधी**

राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक किसन बाबुराव तथा अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची भारतीय जनता पार्टीचे नेते विनायक देशमुख यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन विचारपूस केली. योगायोगाने त्याचवेळी जिल्ह्याचे नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे हेही अण्णांच्या भेटीसाठी आले होते. यावेळी मंगला देशमुख याही उपस्थित होत्या.



## महात्मा फुले कृषि विद्यापीठात

# कांदा बियाणे विक्रीला पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद

**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले यांच्या देखरेखीखाली कृषि विद्यापीठातील बियाणे विक्री केंद्रात फुले समर्थ या कांदा बियाण्याची विक्री सुरू करण्यात आली. यावेळी पहिल्या दिवशी कांदा बियाणे विक्रीला शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी डॉ. बी.टी. शेटे, डॉ. कैलास गागरे, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे व बियाणे विभागातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कांदा बियाणे विक्रीच्या सुलभतेसाठी विद्यापीठाने यावर्षी कांदा उत्पादक असणार्या नाशिक, अहिल्यानगर व सातारा जिल्ह्यातील कृषि विद्यापीठाच्या अनेक केंद्रांमध्ये बियाणे विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील कृषि संशोधन केंद्र, निफाड, कांदा लसूण व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, कृषि महाविद्यालय, मालेगाव या ठिकाणी विक्री करण्यात येत आहे. सातारा जिल्ह्यामध्ये कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव, कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि महाविद्यालय, पुणे येथेही विक्री होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि महाविद्यालय, हळगाव, जामखेड, नगर–पुणे रस्त्यावरील कृषि संशोधन केंद्र, चास व कृषि संशोधन केंद्र, सावळीविहीर, ता. राहाता या ठिकाणी फुले समर्थ बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७२८८ किलो बियाणे व उर्वरित नऊ जिल्ह्यातील विक्री केंद्रामध्ये ३७१२ किलो असे मिळून ११.० टन कांदा बियाणे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले यांनी सांगितले.

# ग्रामसमृध्द हिवरेबाजार आता होणार आरोग्यसमृध्द- शेटे

**नगर तालुका । प्रतिनिधी**

ग्रामविकासात आदर्श ठरलेले हिवरेबाजार गाव आता आरोग्यदृष्ट्या देखील आदर्श ठरणार असून राज्यातील पहिले आरोग्यदायी गाव म्हणून ओळख निर्माण करणार आहे, असे प्रतिपादन आयुष्यमान भारत मिशन व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. सोमवार, २६ मे रोजी हिवरेबाजार येथे आयुष्यमान भारत कार्ड वितरण शिबिराचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री पोपट पवार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. शेटे म्हणाले की, देश महासत्ता होण्यासाठी प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य आणि शिक्षणाची पूर्ण सुविधा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत आयुष्यमान भारत योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील आणि गरजूंना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्यसेवा



देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमानंतर जॉगिंग पार्क येथे मान्यवरांच्या हस्ते वृक्षलागवडही करण्यात आली. ग्रामस्थांच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नंदकुमार नेहरकर, आयुष्यमान भारतचे जिल्हा समन्वयक डॉ. रोहित करांडे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिकेत भालसिंग, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद काकडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती शिंदे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. शिवानी कुलकर्णी, सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, दूध संस्था चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे, एस.टी. पादीर, रो. ना. पादीर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिवरेबाजार येथूनच जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून कामाची सुरुवात करत असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. बदलत्या जीवनशैलीत व फास्ट फूडच्या युगात आरोग्याकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. रासायनिक खते, औषधे आणि प्रक्रिया केलेले अन्न यामुळे कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढत असून ती चिंताजनक बाब आहे. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली लोकसहभागातून घडवलेले हे काम पाहून मी थक्क झालो. हे गाव इतरांसाठी प्रेरणास्थान असून पोपटराव पवार हे खरेच एक चालते बोलते विद्यापीठ आहेत, असे गौरवोद्गार जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी काढले.

# हिमालयाची सावली त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फ ेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात



माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# स्वरकबिरा

**कलासंवाद । उध्दव के.पी.**

एका लग्नात वर्गमित्र भेटला म्हणाला, आता आपलं आयुष्य यातच जाणार राव, आमच्या सारख्यांचे जाऊद्या पण तू इतका हुशार होतास शाळेत. नेहमी प्रथम क्रमांक असायचा. इंग्रजीत तर तू नेहमीच टॉपर होतास. मी मनातल्या मनात हसलो, त्याच्या भावनांचा रिस्पेक्ट करत खरंतर आपण अधिकारी झालो असतो राव हा विचार मनाला चाटून गेला. पण माणसाच्या आयुष्यात काही टर्न येतात, जातात. माणसाने सतत सकारात्मक राहावे आणि जिवन जगत राहावे असं मला वाटतं... जे आहे ते आहे, जे झालं ते झालं. विषय संपला.




पान पलटी धडा सुरू... असो पण जे स्विकारलं त्यात काहितरी चांगलं करता येत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. शाळेत, कॉलेजात हुशार होतो नेहमी टॉपर राहिलो हे जरी खरं असलं तरी आता मी जे काम करतोय त्यात मी नाराज अजिबात नाही. स्टेजशी मी जबरदस्त प्रामाणिक आहे. आणि शिक्षणाचा फायदा आहेच की सर्वांगीण ज्ञान असल्याशिवाय कार्यक्रम गाजवता येत नाहीत. नुसतं झाकपॅक करून नाही जमत तर तुमचं ज्ञान सुद्धा वापरावे लागते...असो. ऑर्केस्ट्राला प्रतिष्ठा नाही पासून सुरू झालेला माझा प्रवास ऑर्केस्ट्रा हाच मुख्य व्यवसाय आणि माझी उपजीविका बनली. मला याचा अभिमानही आहे आणि आनंदही... स्वरकबिरा सादर करताना काही तत्वे आहेत ती मी जपतोकायम अभ्यास, निरीक्षण आणि वास्तविक परिस्थिती याचा मेळ घालून कार्यक्रम सादर केला की लोकांना आवडतो. कमी आवाजात, लोकांना जे हवे ते सादर करणे, कार्यक्रमात आपणच आयोजक आहोत हे समोर ठेऊन सतत सक्रिय राहणे, आणि समोरच्यांना आदर देत सर्वांना मोठेपणा देत कार्यक्रम सादर केला की, तो आवडतो. शिकत आहे अजून. शिकत राहील....

धन्यवाद स्वरकबिरा...
धन्यवाद माईक
धन्यवाद लोकहो

लोकसंग्रह करणे हा माझा आवडता छंद आहे. आज माझ्या मोबाईलमध्ये पर्सनल ओळखीचे साडे आठ हजार नंबर सेव्ह आहेत. तेच माझी ताकत आहेत. माझे मित्र, माझे शिक्षक, माझे गाववाले, माझे सर्व ग्राहक हीच माझी ताकत आहेत...

**लव्ह्यू आणि खूप खूप खूप थँक्स.**





# आपला मावळाच्या माध्यमातून स्वच्छता व गड संवर्धनाची शपथ

## खासदार निलेश लंके यांची उपस्थिती

**रायगड । तुषार सोनवणे**

रायरेश्वर गडावर एक ऐतिहासिक व प्रेरणादायी क्षण अनुभवण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतलेल्या या पवित्र भूमीवर आपला मावळा या संघटनेच्या माध्यमातून गडसंवर्धन आणि स्वच्छतेची सुरुवात करण्यात आली. खासदार निलेश लंके यांच्या पुढाकारातून झालेल्या या मोहिमेत हजारो शिवभक्तांनी सहभाग घेत शपथ घेतली की, गड आणि किल्ले ही आपल्या वारशाची जबाबदारी आहे आणि ती जपण्याची नवी सुरुवात आजपासून केली जाईल.पावसाची पर्वा न करता शेकडो मावळ्यांनी स्वच्छता, वृक्षारोपण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विजेचे दिवे बसवणे, सूचना फलक लावणे अशा विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हे उपक्रम केवळ एक दिवसापुरते मर्यादित न राहता, दर महिन्याला एका गडावर अशी मोहीम राबवण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी खासदार निलेश लंके म्हणाले ''जय शिवाजी, जय भवानी'' हे केवळ घोषवाक्य न राहता कृतीतून शिवरायांच्या विचारांचा प्रसार होणं गरजेचं आहे. प्रत्येक गड हा आपल्या इतिहासाचा साक्षीदार आहे आणि पुढील पिढ्यांसाठी ही ठिकाणं अभिमानाने टिकवून ठेवणं ही आपली जबाबदारी आहे. ''गड आपले-जबाबदारीही आपली!'' हे ब्रीद घेऊन सुरू झालेली ही चळवळ भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.




गेल्या ३ दिवसांपासुन पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने सावेडी येथील जॉगिंग ट्रॅकला तळ्याचे स्वरूप आले. (छाया- विजय मते)

# शौकत तांबोळी राष्ट्रवादी कॉँग्रेस शहर जिल्हा निरीक्षकपदी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या छत्रपती संभाजीनगरचे शहर जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या आदेशाने व पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती करून पत्र देण्यात आले. यावेळी अध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या छत्रपती संभाजीनगरचे शहर



जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा दांडगा जनसंपर्क असून पक्षाची संघटनात्मक बांधणी उत्तमरीत्या करून पक्ष मजबूत करण्यासाठी सर्व शक्तीनिशी कटीबद्ध राहणार असल्याचे सांगितले तर सत्काराला उत्तर देत नूतन संभाजीनगर शहर जिल्हा निरीक्षक हाजी शौकत तांबोळी म्हणाले की, पक्षाने जी निरीक्षक पदी जबाबदारी टाकली आहे ती पक्षाचे ध्येय धोरण प्रमाणे कार्य करून पक्षाचे संघटन व ताकद वाढवण्यासाठी व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार सर्व दूर पोहोचवण्यासाठी कटीबद्ध राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

# आता झाला भारत, जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था

भारताने एक ऐतिहासिक यश संपादन करत जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याचा मान मिळवला. ही माहिती नीती आयोगाचे सीईओ बी.व्ही.आर. सुब्रह्मण्यम यांनी १० व्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीनंतर दिली.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) सध्या ४.१८७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सवर पोहोचले, तर जपानचे ४.१८६ ट्रिलियन डॉलर्स इतके आहे. यामुळे भारत आता अमेरिका, चीन आणि जर्मनीनंतर जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाला.



**तुषार सोनवणे**
अहमदनगर
७९७२३४४४७४

**अर्थवार्ता**

या आर्थिक प्रगतीचे श्रेय भारतातील मजबूत उत्पादन आणि सेवा क्षेत्र, डिजिटल आणि स्टार्टअप क्रांती, तसेच परकीय गुंतवणुकीत झालेल्या लक्षणीय वाढीला दिले जात आहे. याशिवाय, 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' यांसारख्या धोरणांनीही या यशात मोठा वाटा उचलला आहे.

याविषयी सुब्रह्मण्यम यांनी सांगितले, भारत चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे आणि आगामी काही वर्षांत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे. ही कामगिरी भारताच्या जागतिक आर्थिक ताकदीला अधिक बळकटी देणारी ठरेल, असेही ते म्हणाले. या ऐतिहासिक टप्प्यामुळे भारतात रोजगाराच्या संधी वाढतील, विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास अधिक मजबूत होईल आणि भारताचा जागतिक स्तरावरील प्रभाव आणखी वाढेल, असा विश्वास तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

# रस्ते दुरुस्तीसाठी नागरिक आक्रमक

## मुख्याधिकाऱ्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास चिखलाने अभिषेक

**पाथर्डी । प्रतिनिधी**

मागील १५ दिवस चालु असलेल्या अवकाळी पावसामुळे पाथर्डी शहरातील व उपनगरांमधील रस्त्याची अवस्था बिकट झाली असून याला जबाबदार शहरामध्ये सुरू असलेली भूमिगत गटार योजना व पालिका प्रशासनाचा भ्रष्टाचारी व गलथान कारभार असल्याचा आरोप करत आज शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी नाईक चौकात मुख्याधिकारी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास चिखलाने अभिषेक घालत आंदोलन केले.

यावेळी आपचे माजी जिल्हाध्यक्ष किसन आव्हाड, माजी नगरसेवक चांद मनियार, भाजपचे माजी शहराध्यक्ष नागनाथ गर्जे, सामाजिक कार्यकर्ते गोरख ढाकणे, आण्णा हारेर, मुन्नाभाई शेख, बब्बू बागवान,जुबेर मनियार आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना सर्व वक्त्यांनी स्थानिक प्रशासनावर व सुरू असलेल्या भुमिगत गटार योजनेच्या कामावर सडकून टीका केली. यावेळी प्रशासनास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाथर्डी शहरामध्ये नगर परिषदेकडून सुमारे २४१कोटी रुपये खर्चाची भूमिगत गटार योजनेचे काम करत असताना ठेकेदाराने व अधिकाऱ्यांनी मनमानी करून पूर्वीचे असलेले चांगले सिमेंट कॉंक्रिटीकरण, खडीकरण व डांबरीकरण केलेले रस्ते मधोमध फोडल्याने सर्व रस्त्यांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात खड्डे व चिखल झालेला आहे. यामुळे पायी चालणे ही मुश्किल झाले आहे तर वाहनचालकांचे अपघात होत आहेत. तरी पावसाळा सुरू झाल्याने हे काम थांबवावे व ज्या ज्या ठिकाणी ठेकेदाराने गटार योजनेचे काम केले त्या कामांच्या ठिकाणी तात्काळ रस्ते दुरुस्त करण्यात यावेत व शहर चिखलमुक्त करावे तसेच शहरांमध्ये अनेक ठिकाणी गटारी तुंबल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्या त्रासामधून शहराची मुक्तता करावी व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी जर आगामी आठ दिवसांमध्ये आपण याबाबत कुठलीही कारवाई केली नाही किंवा रस्ते दुरुस्त करून पूर्ववत केले नाही तर आम्ही मुख्याधिकारी व पालिका प्रशासन विरोधात तिव्र आंदोलन करणार आहोत. आजचे आंदोलन आम्ही शांततेच्या मार्गाने केले आहे मात्र पुढील आठ दिवसांमध्ये होणारे आंदोलने हे तीव्र स्वरूपाचे असेल असा इशारा यावेळी निवेदनात देण्यात आला आहे.